# सायफाय करंडक स्पर्धेत 'आय ॲग्री' विजेती

**प्रतिनिधी, पुणे**

**सायफाय करंडक** एकांकिका स्पर्धेत आमचे आम्ही संस्थेची आय ॲग्री ही एकांकिका विजेती ठरली. नाट्यसंस्कार पुणेची 'एफ ५७' द्वितीय आणि मुंबईच्या स्वप्नपूर्ती क्रिएशन्सची 'कम्युनिकेशन एरर' तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली.

थिएटर ॲकॅडमी, क्विक हिल फाउंडेशन आणि महाराष्ट्र सायबर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सायफाय करंडक स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण अभिनेता रितेश देशमुख आणि जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते झाले. थिएटर ॲकॅडमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे, क्विक हिलचे व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, संजय काटकर, महाराष्ट्र सायबरचे सचिन पांडकर, परीक्षक आनंद इंगळे, विजय केंकरे आदी या वेळी उपस्थित होते.

राज्यभरातील केंद्रांवर झालेल्या प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी नऊ एकांकिकांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

